मफुकृवि ई वार्ता
ऑक्टोबर २०२१

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
वर्ष :१, अंक क्र. : १०,ऑक्टोबर, २०२१

# महात्मा फुले कृषि विद्यापीठाचा पस्तीसावा पदवीदान समारंभ संपन्न

## खा. शरद पवार आणि ना. नितीन गडकरी यांना महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या पदवीदन समारंभामध्ये ''डॉक्टर ऑफ सायन्स'' प्रदान

## संकल्प निश्चित करुन कृषि पदवीधरांनी प्रगतीची वाटचाल करावी
## – मा. राज्यपाल श्री. भगत सिंह कोश्यारी










**दि. २८ ऑक्टोबर, २०२१.** पदवी मिळविलेल्या विद्यार्थ्यांनी नाविण्यपूर्ण संशोधन करण्यासाठी प्रयत्न करा. या संशोधनातून उद्योजकतेची निर्मिती होवून रोजगाराच्या संधी निर्माण होवू शकतील. यासाठी विद्यार्थ्यांनी चांगला संकल्प समोर ठेवून शेतकऱ्यांचा आणि देशाचा उद्धार करावा. विश्वात असलेले सर्व चांगले विचार आत्मसात करा. इंग्रजीला प्राधान्य देण्याबरोबरच सर्वांनी आपल्या मातृभाषेचा सन्मान करावा असे प्रतिपादन राज्याचे मा. राज्यपाल श्री. भगत सिंह कोश्यारी यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या पस्तीसावा पदवीदान समारंभात स्नातकांना उद्देशून अध्यक्षीय मार्गदर्शनात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्रतिकुलपती तथा मंत्री, कृषि आणि माजी सैनिक कल्याण, महाराष्ट्र राज्य ना.श्री. दादाजी भुसे, उदयपूर येथील महाराणा प्रताप कृषि आणि तंत्रज्ञान विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नरेंद्र सिंह राठौड हे प्रमख पाहुणे म्हणुन उपस्थित होते. या प्रसंगी माजी केंद्रीय कृषि मंत्री, भारत सरकार, नवी दिल्ली आणि राज्यसभा सदस्य

मफुकृवि ई वार्ता
ऑक्टोबर २०२१

वर्ष :१, अंक क्रं. : १०,ऑक्टोबर, २०२१ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी











खा. श्री. शरद पवार आणि केंद्रीय मंत्री, रस्ते, वाहतूक आणि परिवहन, भारत सरकार ना. श्री. नितीन गडकरी, कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील, अधिष्ठाता (कृषि) डॉ. प्रमोद रसाळ, कुलसचिव श्री. प्रमोद लहाळे आणि कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. दिलिप पवार व्यासपीठावर उपस्थित होते.

राज्यपाल पुढे म्हणाले की, देशातील कृषि क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्यामुळे खा. शरद पवार व ना. नितीन गडकरी हे आपल्यासाठी चमकत्या ताऱ्यांप्रमाणे आहेत. कृषि विद्यापीठाच्या प्राध्यापकांनी तसेच कृषि पदवीधरांनी या दोन्ही व्यक्तींचे आदर्श समोर ठेवून कृषि क्षेत्रात कार्य करावे. शेतकऱ्यांनी जी.आय. मानांकनाचा वापर करुन जास्तीत जास्त पेटंट मिळविण्यासाठी प्रयत्न करावा. औद्योगीक क्षेत्रासह सर्व काही बंद असतांना फक्त शेती व शेती क्षेत्राशी संबंधीत उद्योग चालू राहून खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांनी सर्वांना आधार दिला. त्यामुळे शेतकऱ्यांचे हे योगदान न विसरण्यासारखे आहे. यावेळी कृषिमंत्री ना. श्री. दादाजी भुसे आपल्या भाषणात म्हणाले कृषिची पदवी मिळविल्यानंतर त्यातील फक्त १० ते १५ टक्के विद्यार्थी कृषिशी संबंधीत क्षेत्रात कार्यरत राहतात. विद्यार्थ्यांनी भविष्यात आपले क्षेत्र कुठलेही निवडा परंतु ज्या कृषिचे शिक्षण तुम्ही घेतले त्या कृषि क्षेत्राशी तसेच शेतकऱ्यांशी प्रामाणिक राहुन शेतकऱ्याला संपन्न बनविण्यासाठी तुमचे सर्वोच्च

योगदान द्या. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. नरेंद्र सिंह राठौड आपल्या दीक्षांत भाषणात म्हणाले की कृषि शिक्षण हे सर्वांसाठी महत्वाचे आहे. विद्यार्थ्यांनी पदवी मिळविल्यानंतर उद्योजक होऊन रोजगाराच्या संधी निर्माण कराव्यात. कृषि शिक्षण अभ्यासक्रमात औद्योगिक क्षेत्रातील गरज लक्षात घेवून त्याप्रमाणे बदल करणे गरजेचे आहे. कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांनी विद्यापीठाचा कृषि शिक्षण, संशोधन व विस्तार शिक्षणाचा अहवाल सादर केला. कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले विद्यापीठ विविध विषयांमध्ये पदविका, कृषि पदवी, पद्व्युत्तर आणि आचार्य पदव्यांमध्ये विद्यार्थ्यांना शिक्षण देते. गेल्यावर्षी विद्यापीठाने विविध पिकांचे नऊ वाण, तीन कृषि यंत्रे व औजारे आणि एकूण ६३ तंत्रज्ञान शिफारशी विकसित करुन शेतकर्यांसाठी प्रसारीत केलेल्या आहेत. विस्तार शिक्षण क्षेत्रात देखिल विद्यापीठाने नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले आहेत.

राज्याचे राज्यपाल आणि कृषि विद्यापीठाचे कुलपती मा. श्री. भगत सिंह कोश्यारी यांच्या शुभहस्ते माजी केंद्रीय कृषिमंत्री खा. शरद पवार आणि केंद्रीय रस्ते, वाहतूक आणि परिवहन मंत्री ना. नितीन गडकरी यांनी कृषि क्षेत्रासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना डॉक्टर ऑफ सायन्स या मानद पदवीने सन्मानीत करण्यात आले. यावेळी कुलगुरु डॉ. पाटील यांनी मानपत्रांचे वाचन केले. तसेच यावेळी १०४ विद्यार्थ्यांना पीएच. डी., ६२८ विद्यार्थ्यांना पदव्युत्तर पदवी व १०,७३६ विद्यार्थ्यांना पदवी असे एकुण ११,४६८ पदव्या प्रदान करण्यात आल्या. मा. राज्यपाल श्री. भगत सिंह कोश्यारी यांचे शुभहस्ते सन २०१९–२० मध्ये बी.एस्स.सी (कृषि) पदवीत प्रथम आलेली कु. हर्षदा देसले, बी.एस्स.सी (उद्यान विद्या) मध्ये प्रथम आलेली कु. सोनाली माने, कृषि अभियांत्रिकीमध्ये प्रथम आलेला मृणाल मारणे तसेच सन २०२०–२१ मध्ये बी.एस्स.सी (कृषि) पदवीत प्रथम आलेली कु. प्रेरणा खोत, बी.एस्स.सी (उद्यान विद्या) मध्ये प्रथम आलेला ऋषिकेश भवर, कृषि अभियांत्रिकीमध्ये प्रथम आलेला आदित्य जोशी यांना सुवर्णपदक व इतर यशस्वी विद्यार्थ्यांना पदके प्रदान करण्यात आली.

समारंभाला नगरविकास व उर्जा राज्यमंत्री ना. श्री. प्राजक्त तनपुरे, खा. सुजय विखे पाटील, खा. सदाशीव लोखंडे, साईबाबा विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष आ. आशुतोष काळे, आ. किरण लहामटे, माजी आ. श्री. शिवाजी कर्डिले, विद्यापीठ कार्यकारी परिषदेचे सदस्य आ. श्री. नरेंद्र दराडे, आ. श्री. किशोर दराडे, श्री. दत्तात्रय उगले, श्री दत्तात्रय पानसरे, जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा सौ. राजश्री घुले, विद्यापीठाचे विद्या परिषदेचे सदस्य, दापोली कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. संजय सावंत, परभणी कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. अशोक ढवण, संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, माजी कुलगुरू डॉ. योगेंद्र नेरकर, अहमदनगरचे जिल्हाधिकारी श्री. राजेंद्र भोसले, पोलीस अधिक्षक श्री मनोज पाटील, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी श्री शिवाजीराव जगताप, नियंत्रक श्री. सुखदेव बलमे, विद्यापीठ अभियंता श्री. मिलिंद ढोके, विद्या शाखेचे उपकुलसचिव श्री. विजय दाभाडे, मान्यवर, पत्रकार, सहयोगी अधिष्ठाता, विभाग प्रमुख, अधिकारी, शास्त्रज्ञ, विद्यार्थी व विद्यार्थीनी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. बापुसाहेब भाकरे आणि डॉ. भगवान देशमुख यांनी केले.

मफुकृवि ई वार्ता
ऑक्टोबर २०२१

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

वर्ष :१, अंक क्रं. : १०,ऑक्टोबर, २०२१

## मा. राज्यपालांनी साधला शेतकऱ्यांशी संवाद





**दि. २७ ऑक्टोबर २०२१.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे माननीय राज्यपाल, महाराष्ट्र राज्य आणि कुलपती, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी श्री. भगत सिंह कोश्यारी यांनी विविध प्रकल्पांना भेट देऊन पाहणी केली. यावेळी त्यांच्यासमवेत कुलगुरू डॉ. पी. जी. पाटील, संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, कुलसचिव श्री. प्रमोद लहाळे, नियंत्रक श्री. सुखदेव बलमे, विद्यापीठ अभियंता श्री. मिलिंद ढोके उपस्थित होते. यावेळी राज्यपाल महोदयांनी विद्यापीठातील कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र, गायीमधील गर्भ हस्तांतरण तंत्रज्ञानाचे प्रात्यक्षिक, उद्यानविद्या प्रक्षेत्रावरील फळपिकांचे प्रात्यक्षिक, औषधी व सुगंधी वनस्पती प्रकल्प, उद्यानविद्या रोपवाटिका, अंतर विद्याशाखेचे जलसिंचन पार्क, हवामान अद्ययावत शेती व जलव्यवस्थापनाचे आधुनिक कृषि विज्ञान व तंत्रज्ञान केंद्र कास्ट कासम या प्रकल्पांना भेटी दिल्या. यानंतर त्यांनी अहमदनगर, सांगली, नाशिक या जिल्ह्यातून आलेल्या शेतकऱ्यांशी संवाद साधला.

महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या ३५ व्या पदवीदान समारंभाच्या पूर्वसंध्येला शेतकऱ्यांशी संवाद साधताना राज्यपाल म्हणाले की शेतकऱ्यांनी नवनवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करून आपली शेती करावी. पूर्वीच्या काळी लोक असे म्हणायचे की उत्तम शेती– मध्यम व्यापार व कनिष्ठ नोकरी. तीच गोष्ट आज कोरोनाच्या जागतिक महामारीमध्ये सिद्ध झाली की, फक्त शेती क्षेत्राने सगळ्यांना आधार देण्याचे काम केले. शेतकरी बांधवांनी सेंद्रिय शेतीकडे अधिक लक्ष दिले पाहिजे. आपल्या भागातील पिकांचे उत्कृष्ट वाणांचे जी आय मानांकन केले तर शेतकऱ्याला त्याच्या मालाची योग्य किंमत जागतिक बाजारपेठेमध्ये मिळू शकते, हे महाराष्ट्रातील बऱ्याच शेतकऱ्यांनी दाखवून दिले आहे. शेतकऱ्यांनी ग्रुप करून शेती केली तर शेतकऱ्यांच्या ती अधिक फायद्याची राहील. शेवटी राज्यपालांनी शेतकऱ्यांना कृषि विद्यापीठातील शास्त्रज्ञांचा सल्ला घेण्याचे तसेच चॅम्पियन बनण्याचा सल्ला यावेळी दिला. राज्यपालांशी संवाद साधणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये कृषिभूषण डॉ. दत्तात्रय वने, श्री. सुरसिंग पवार, श्री. मच्छिंद्र घोलप, श्री. विष्णू जरे, श्री. संजीव माने, मेजर श्री. ताराचंद्र गागरे, श्री. राजेंद्र वरघुडे, श्री. प्रवीण गाडे, श्री.मारुती गीते, श्री. प्रणव धोंडे, सौ. सविता नालकर, श्री. शिवाजी थोरात, श्री. श्रीनिवास बागल, श्री. रामदास थेटे, श्री. राहुल रसाळ, श्री. सारंगधर निर्मळ, श्री. रविंद्र कडलग, श्री. अशोक खोत या शेतकऱ्यांचा समावेश होता.

मफुकृवि ई वार्ता
ऑक्टोबर २०२१

## केंद्रिय मंत्री ना. नितीन गडकरी यांची कास्ट प्रकल्पाला भेट





**दि. २८ ऑक्टोबर, २०२१.** सद्यस्थितीत भारतात शेतीमध्ये फवारणी करण्यासाठी ड्रोनचा वापर होत असून त्यांची किंमत रु. ५ ते ६ लाख पर्यंत आहे. जर फवारणीसाठी वापरण्यात येणाऱ्या ड्रोनची निर्मिती भारतात मोठया प्रमाणत केली तर त्यांची किंमत ३ ते ४ लाख रुपयापर्यंत येवू शकते. शेतकऱ्यांना जर शेतीच्या विविध कामासाठी ड्रोनचा वापर अधिक किफायतशीर करावयाचा असेल तर ड्रोनची किंमत १.५ लाखापर्यंत कमी करणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत लिथियम बॅटरीवर चालणारे ड्रोन ऐवजी जैविक इंधनावर चालणारे ड्रोनची निर्मिती केली तर ड्रोनची किंमत कमी होवून त्यांचा अवलंब शेतकऱ्यांना फवारणीसाठी करणे किफायतशीर होईल असे प्रतिपादन केंद्रिय मंत्री, रस्ते, वाहतुक आणि परिवहन, भारत सरकार ना. नितीन गडकरी यांनी महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरीच्या जागतिक बँक अर्थसाहित, भारतीय कृषि अनुसंधान परिषद, राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्प, नवी दिल्ली पुरस्कृत हवामान अद्ययावत शेती व जल व्यवस्थापन प्रकल्पाला भेट देवून विविध प्रयोगशाळांची पहाणी करतांना केले. या प्रसंगी खा. डॉ.सुजय विखे पाटील, महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील, संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख उपस्थित होते. प्रकल्प संशोधक डॉ. सुनिल गोरंटीवार, तसेच प्रकल्प सहसंशोधक डॉ. मुकुंद शिंदे व डॉ. सुनिल कदम यांनी या वेळी ड्रोनचे प्रात्यक्षिक व विविध प्रयोगशाळेतील शेती उपयोगी विकसित केलेल्या विविध डिजिटल तंत्रज्ञानाची माहिती दिली. शेतकऱ्यांचा सर्वांगीण विकास करावा या विषयी मार्गदर्शन करुन या प्रकल्पातंर्गत होत असलेल्या शेतकरीभिमुख कार्याविषयी त्यांनी समाधान व्यक्त केले. या भेटीदरम्यान कास्ट प्रकल्पा अंतर्गत उभारण्यात आलेल्या ड्रोन आणि रोबोटिजएस प्रयोगशाळा, फवारणी, ड्रोन प्रात्यक्षिक, आयओटी आधारित मृदा सेन्सर, इत्यादी ठिकाणी भेटी देवून माहिती जाणुन घेतली. तसेच या भेटी दरम्यान कास्ट प्रकल्पातील सदस्य, संशोधन सहयोगी व इतर कर्मचारी यांच्याशी चर्चा केली व त्यांना मार्गदर्शन केले.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
वर्ष :१, अंक क्रं. : १०,ऑक्टोबर, २०२१

## महात्मा फुले कृषि विद्यापीठाची कुशल मनुष्यबळ निर्मितीमध्ये आघाडी

**दि. २८ ऑक्टोबर, २०२१.** सरदार वल्लभभाई पटेल सर्वोत्कृष्ट विद्यापीठ पुरस्कार (२००२), देशातील उत्कृष्ट संस्था म्हणुन १०० कोटी रुपयांचे विशेष पारितोषीक (२००८), देशातील सर्वात पसंतीची संस्था (२००९) यासारख्या पारितोषीकांनी गौरविल्या गेलेल्या राहुरीच्या महात्मा फुले कृषि विद्यापीठाने आत्तापर्यंत विविध विद्याशाखाच्या एकुण १,१५,३४९ स्नातकांच्या कुशल मनुष्यबळाची निर्मिती केली आहे. शेती, उद्योग आणि प्रशासकीय सेवेत विद्यापीठाचे पदवीधर कार्यरत आहेत. सन १९६८ साली स्थापन झालेल्या या विद्यापीठाचे कार्य शिक्षण, संशोधन आणि विस्तार शिक्षण या तीन शाखांद्वारे चालते. सद्यस्थितीत या विद्यापीठांतर्गत ८ घटक आणि ६४ संलग्न महाविद्यालये आहेत. तसेच ९ घटक आणि ६५ कृषि तंत्र विद्यालये, एक कृषि तंत्र निकेतन आहेत. याद्वारे विद्यार्थ्यांना कृषि विषयक शिक्षण देण्यात येते. विद्यापीठांतर्गत कृषि, उद्यानविद्या, कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, कृषि व्यवसाय व्यवस्थापन या विद्याशाखांतर्गत पदवी तसेच पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम चालविले जातात. जैव तंत्रज्ञान विषयात पदवी अभ्यासक्रम आहे. पदव्युत्तर पदवीच्या १८ विषयात तर आचार्य (पीएच.डी.) पदवीच्या १७ विषयात अभ्यासक्रम राबविण्यात येतो.

आंतरराष्ट्रीय सहयोग कार्यक्रमांतर्गत राहुरी कृषि विद्यापीठाने नेदरलँड येथील व्हॅन हॉल लॅरेनस्टीन विद्यापीठाबरोबर बी.एस्सी. (कृषि), बी.एस्सी. (पशुविज्ञान) आणि बी.बी.ए. (कृषि) विषयांबरोबरच कृषि व्यवसाय व्यवस्थापन प्रत्यक्ष कार्यानुभवावर आधारीत शिक्षण कार्यक्रम तसेच बॅकॉक येथील एशियन तंत्रज्ञान संस्थेबरोबर कृषि व्यवसाय व्यवस्थापन विषयात पदवी तसेच पदव्युत्तर पदवी, उद्यानविद्या विषयात कार्यानुभवावर आधारीत शिक्षण कार्यक्रमासंबंधी करार झालेला आहे. भा.कृ.अ.प., नवी दिल्लीच्या राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्पांतर्गत हवामान अद्ययावत शेती व जलव्यवस्थापन प्रकल्पाचे अद्ययावत कृषि विज्ञान व तंत्रज्ञान केंद्र (कास्ट–कासम) हा जागतीक बँकेच्या आर्थिक पाठबळाने चालविला जाणारा प्रतिष्ठीत असा प्रकल्प राहुरीच्या महात्मा फुले कृषि विद्यापीठाला मिळाला आहे. या केंद्राद्वारे तयार करण्यात आलेल्या फुले रोबो फवारणी यंत्राला नवी दिल्लीत झालेल्या कृषि भारत हॅकथॉन–२०२० या प्रदर्शनात प्रथम क्रमांक मिळाला आहे. विद्यापीठाच्या इतिहासात प्रथमच कास्ट–कासम प्रकल्पाद्वारे पदव्युत्तर व आचार्य पदवीच्या एकुण २० विद्यार्थ्यांची आंतरराष्ट्रीय प्रशिक्षणासाठी बॅकॉक, थायलंड येथील ड्रोनचे ॲप्लीकेशन आणि गुगल अर्थ इंजिन या प्रशिक्षणासाठी निवड झाली. या विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांन राष्ट्रीय पातळीवरील जे.आर.एफ., एस.आर.एफ., नेट, गेट, कॅट, ए.आर.एस. या सारख्या परिक्षांमध्ये उल्लेखनीय कामगीरी केली आहे. अशा प्रकारे या विद्यापीठाने शिक्षण, संशोधन तसेच विस्तार क्षेत्रात यशस्वी कामगिरी केली आहे. याबरोबरच या विद्यापीठातून पदव्या प्राप्त केलेल्या नव उद्योजकांनी स्वतःचा उद्योग उभारुन रोजगाराची संधी उपलब्ध करुन विद्यापीठाच्या नावलौकीकात भरच टाकलेली आहे. पदवीदान समारंभामध्ये विविध विद्याशाखांच्या पदवी, पदव्युत्तर, आचार्य पदवी मिळुन ११ हजार ४६८ स्नातकांना कुलपतींद्वारे अनुग्रहित करण्यात आले.

मफुकृवि ई वार्ता
ऑक्टोबर २०२१

अन्नं बहु कुर्वीत तद् व्रतम्

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी   वर्ष :१, अंक क्रं. : १०,ऑक्टोबर, २०२१

## राज्यातील एकुण हरभरा क्षेत्रापैकी ४० टक्के क्षेत्रावर राहुरी विद्यापीठाच्या हरभरा वाणांची लागवड



**दि. ६ ऑक्टोबर, २०२१.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाने विकसीत केलेल्या हरभरा वाणांमुळे राज्याच्या हरभरा उत्पादनामध्ये लक्षणीय वाढ झाली असुन, राज्याला कडधान्यामध्ये स्वयंपुर्णतेकडे वाटचाल करणेसाठी मोठे योगदान दिलेले आहे. महात्मा फुले कृषि विद्यापीठाने आत्तापर्यंत हरभऱ्याचे १४ वाण विकसीत केलेले आहेत. यापैकी चार वाण राष्ट्रीय पातळीवर प्रसारीत करण्यात आलेले आहेत. आज राज्याच्या ४० टक्के क्षेत्रावर राहुरी विद्यापीठाच्या हरभरा वाणांची लागवड केली जाते. महात्मा फुले कृषि विद्यापीठाने विकसीत केलेल्या हरभऱ्याच्या वाणांनी राज्यातील शेतकऱ्यांना समृध्द केले आहे. या वाणांनी आत्तापर्यंत राज्यातील हरभरा उत्पादक शेतकऱ्यांना रु. २९१२०.३७ कोटी दिले आहे.

महाराष्ट्र राज्य हरभरा पिकाच्या क्षेत्र व उत्पादनामध्ये देशामध्ये दुसऱ्या क्रमांकावर असून, सन २०२०-२१ मध्ये राज्यात २५.९४ लाख हे. क्षेत्रावर या पिकाची लागवड करण्यात आली आणि त्यापासून २८.६६ लाख टन इतके उच्चांकी उत्पादन मिळाले. राज्याची उत्पादकता ११०५ किलो प्रति हेक्टर आहे. सन २०१०-११ च्या तुलनेत आज हरभऱ्याचे ८६ टक्के क्षेत्र, ११८ टक्के उत्पादन आणि १८ टक्क्यांनी उत्पादकतेत वाढ झालेली आहे. पारंपारीक पध्दतीमध्ये हरभरा हे पीक स्थानिक वाणांचे बियाणे वापरुन केले जात होते. परंतु, अलिकडील काळात कृषि विद्यापीठाच्या संशोधनातुन शेतकरी बांधवांना हवे असलेले जिरायत, बागायत आणि उशिरा पेरणीसाठी तसेच मर रोग प्रतिकारक्षम वाण उपलब्ध झाल्यामुळे हरभरा क्षेत्रात आणि उत्पादनात वाढ झाल्याचे दिसून येते. महाराष्ट्रातील या पिकाखालील वाढते क्षेत्र पाहता हरभरा हे पीक रब्बी हंगामातील प्रथम क्रमांकाचे नगदी पीक झाले आहे. हरभरा पिकाच्या वाढीबरोबर जमिनीतील ओलावा कमी होत जातो आणि पाण्याचा ताण वाढु लागतो. अशा प्रतिकुल परिस्थितीत इतर पिकांच्या तुलनेत अधिक उत्पादन देणारे आणि जमिनीचा कस वाढवणारे हरभरा पीक रब्बी हंगामासाठी वरदान आहे. कडधान्य सुधार प्रकल्पाने हरभरा पिकापासुन जास्तीत जास्त उत्पादन घेण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याची शिफारस केलेली आहे. यामध्ये योग्य जमिनीची निवड आणि पूर्व मशागत, अधिक उत्पादन देणाऱ्या आणि रोगप्रतिकारक्षम वाणांचा वापर, बिजप्रक्रिया आणि जिवाणू संवर्धनाचा वापर, वेळेवर पेरणी आणि पेरणीचे योग्य अंतर, तणनियंत्रण, पाण्याचे योग्य व्यवस्थापन आणि रोग व किडींपासून पिकाचे संरक्षण याबाबींचा सामावेश होतो.

महात्मा फुले कृषि विदयापीठाने आजपर्यंत हरभरा पिकामध्ये एकुण १४ वाण प्रसारित केले असुन यामध्ये देशी हरभऱ्याचे विजय, विशाल, दिग्वीजय, विक्रम, विक्रांत आणि विश्वराज तर काबुली हरभऱ्याचे विराट आणि कृपा हे अधिक उत्पादनक्षम वाण असुन शेतकऱ्यांमध्ये लोकप्रिय आहेत. देशी वाणांच्या दाण्यांचा रंग आकर्षक असल्यामुळे चांगला बाजारभाव मिळतो. दिवसेंदिवस शेती उदयोगात होणाऱ्या मजुरांच्या कमतरतेमुळे यांत्रिक पध्दतीने काढणी करता येईल

असा उंच वाढणारा देशी हरभऱ्याचा वाण फुले विक्रम हा विद्यापीठाने विकसीत केला आहे. त्यामुळे कंबाईन हार्वेस्टरच्या सहाय्याने पिकाची काढणी करता येते.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील कडधान्य सुधार प्रकल्पाद्वारे विकसित करण्यात आलेल्या हरभरा पिकांच्या वाणांचे देशाच्या कडधान्य स्वयंपुर्णतेमध्ये महत्वाचे योगदान आहे. राज्यात प्रथमच यांत्रिक पध्दतीने काढणी करणेसाठी फुले विक्रम हा वाण प्रसारित केला आहे. हरभरा पिकामध्ये जिरायत, बागायत आणि उशिरा पेरणीसाठी एकुण १४ वाण प्रसारित केल्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांची आर्थिक प्रगती झाली असुन हरभरा उत्पादनामध्ये राज्य दुसऱ्या क्रमांकावर आहे तसेच भारत सरकारने सुरु केलेल्या सीड हब प्रकल्पांतर्गत शेतकऱ्यांच्या शेतावर बियाणे तयार करुन ते विदयापीठ परत विकत घेते व त्यावर प्रक्रिया करुन ते शेतकऱ्यांना उपलब्ध केले जाते.

**– कुलगुरु डॉ. पी.जी.पाटील**

महात्मा फुले कृषि विद्यापीठाने विकसित केलेल्या हरभरा पिकातील वाणांमुळे राज्याचे क्षेत्र, उत्पादन व उत्पादकता वाढविण्यास मोलाचे योगदान झालेले आहे. सन १९८५ मध्ये राज्याची हरभऱ्याची उत्पादकता प्रति हेक्टर ३.३५ क्विंटल होती. यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होऊन सन २०२०–२१ मध्ये उत्पादकता ११ क्विंटल प्रति हेक्टर झालेली आहे.

**– संचालक संशोधन डॉ. शरद गडाख**

महात्मा फुले कृषि विद्यापीठाने प्रसारीत केलेल्या विविध हरभरा वाणांची मागणी मोठया प्रमाणात असते. त्यानुसार दहा वर्षाच्या आतील वाणांचे केंद्रक बियाणापासुन मुलभुत बियाणे तयार करुन महाबीज, शेतकरी उत्पादक कंपन्याना पुरवठा केला जातो.

**– डॉ. नंदकुमार कुटे, प्रमुख शास्त्रज्ञ, कडधान्य सुधार प्रकल्प**

## पाडेगाव येथे ऊस बेणे विक्रीचा शुभारंभ : चार लाख हेक्टर क्षेत्रावर ऊस लागवडीस पुरेल

**दि. ६ ऑक्टोबर, २०२१.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र, पाडेगावच्या मुलभुत ऊस बेणे विक्रीचा नुकताच शुभारंभ करण्यात आला. ऊसामध्ये एकरी १६८ टन उत्पादन घेणाऱ्या श्री. संजीव माने व श्री. अशोक खोत या प्रगतशील शेतकऱ्यांच्या हस्ते बेणे वाटपाला सुरुवात झाली. महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र, पाडेगाव येथे महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री आणि सहकारमहर्षी शंकरराव मोहिते पाटील सहकारी साखर कारखान्याचे मार्गदर्शक संचालक श्री. विजयसिंह मोहिते पाटील व विधानपरिषद सदस्य आमदार श्री. रणजिंतसिंह मोहिते पाटील यांनी पाडेगावच्या प्रक्षेत्रावरील ऊस बेणे मळयास भेट देऊन संशोधन उपलब्धीची माहिती घेतली. यावेळी ऊस विशेषज्ञ डॉ. भरत रासकर यांनी त्यांचे स्वागत केले.

छडेगाव संशोधन केंद्राने १५.३५ हेक्टर क्षेत्रावर ऊसाच्या मुलभुत बेणे घेतले असुन या बेणेची लागवड डिसेंबर २०२० ते जानेवारी २०२१ या कालावधीत करण्यात आलेली आहे. यामध्ये को–८६०३२ हे वाण ८.०५ हेक्टर क्षेत्रावर तर फुले–२६५ ३.९० हेक्टर, फुले–१०००१ २.३० हेक्टर  आणि फुले ०९०५७ १.१० हेक्टर बेणे क्षेत्राचा समावेश आहे. एकुण एक कोटी दोन डोळा टिपरी बेणे विक्रीस उपलब्ध होणार आहे. हे बेणे १००० एकरासाठी पुरणारे आहे. एक गुंठा लागवडीसाठी दोन डोळ्याची २५० टिपरी लागतात. त्याच्या माध्यमातुन पुढीलवर्षी १२५० ऊस तयार होतील व दोन डोळ्याची २५००० टिपरी उपलब्ध होईल. अशाप्रकारे एक गुंठे प्लॉटमधुन एक हेक्टर क्षेत्रावर लागवड करता येईल. एक

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
वर्ष :१, अंक क्रं. : १०, ऑक्टोबर, २०२१





कोटी बेण्याच्या माध्यमातुन पुढीलवर्षी चार लाख हेक्टर क्षेत्रावर बेणे लावता येईल. बेणे ऊसाच्या दोन डोळ्याच्या एक हजार टिपरीचा तोडणी आणि भरणीसह विक्रीचा दर रु. १५५०/– असा आहे. या केंद्रातुन बेणे घेण्यासाठी बेणे विक्री अधिकारी डॉ. राजेंद्र भिलारे मो.नं. ८२७५४७३१९१ व डॉ. दत्तात्रय थोरवे मो.नं. ९८८१६४४५७३ यांचेशी कार्यालयीन वेळेत सकाळी ९.०० ते सायं. ५.०० वा. पर्यंत संपर्क साधावा. पाडेगाव ऊस संशोधन केंद्र शेतकरी आणि साखर कारखाने यांचे विकासाकरीता सतत प्रयत्नशील आहे. या संशोधन केंद्राने तयार केलेल्या को–८६०३२, फुले–२६५, फुले–१०००१ आणि फुले –०९०५७ या ऊस वाणांच्या बेण्याचा सर्व शेतकऱ्यांनी नविन लागवडीसाठी उपयोग करावा असे आवाहन कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी केले आहे.

## उपमहासंचालक (कृषि शिक्षण) डॉ. आर.सी. अग्रवाल यांची कास्ट प्रकल्पाला भेट

**दि. १७ ऑक्टोबर, २०२१.** विद्यार्थ्यांनी त्यांच्या नाविन्यपूर्ण प्रकल्पाद्वारे उद्योजकता विकसित करून रोजगार निर्मिती करण्यासाठी प्रयत्न करावेत. महाविद्यालयाच्या प्राध्यापकांनी संगणकीय तंत्रज्ञानाच्या मदतीने स्वताला जास्तीत जास्त अपग्रेड केल्यास विद्यापीठाचे मानांकन सुधारण्यास त्याचा फायदा होईल. महात्मा फुले कृषि विद्यापीठात कार्यरत असणाऱ्या हवामान अद्ययावत शेती व जलव्यवस्थापनाचे आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञान केंद्राच्या सहकार्याने डिजिटल तंत्रज्ञानाने समृद्ध बनलेली गावे इतरांना आदर्श ठरतील असे प्रतिपादन नवी दिल्ली येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्पाचे संचालक व कृषि शिक्षणाचे उपमहासंचालक डॉ. आर. सी. अग्रवाल यांनी केले. राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्प व भारतीय कृषि अनुसंधान परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने हवामान अद्ययावत शेती व जलव्यवस्थापनाचे आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञान केंद्र महात्मा फुले कृषि विद्यापीठात कार्यरत असून या प्रकल्पाला भेट दिल्यानंतर मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अग्रवाल बोलत होते. यावेळी कास्ट प्रकल्पाचे अंतर्गत असलेल्या राष्ट्रीय कृषि उच्चशिक्षण प्रकल्पाचे राष्ट्रीय समन्वयक डॉ. प्रभात कुमार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी. जी. पाटील, संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, सहयोगी अधिष्ठाता डॉ. मिलिंद अहिरे, कुलगुरूंचे विशेष कार्य अधिकारी डॉ. महानंद माने, नियंत्रक श्री. सुखदेव बलमे, विद्यापीठ अभियंता श्री. मिलिंद ढोके उपस्थित होते.





डॉ. प्रभात कुमार या वेळी मार्गदर्शन करताना म्हणाले की स्मार्ट तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी वापर करण्यासाठी ते प्रथम वापरण्यास सहज सोपे बनविणे अत्यंत महत्त्वाचे आहे. शेतीच्या यांत्रिकीकरणामध्ये प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करून तयार केलेली उपकरणे ही भविष्यात क्रांतिकारी ठरतील. कुलगुरू डॉ. पाटील आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले की पंतप्रधानांनी सांगितलेल्या आत्मनिर्भर भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी कास्ट सारख्या प्रकल्पांची मदत होणार आहे. विद्यापीठात शिकणाऱ्या मुलांना या प्रकल्पामुळे परदेशी जाऊन शिकण्याची संधी मिळाली आहे. या प्रकल्पाच्या मदतीने तयार केलेली मोबाईल प्स, फुले शेड्युलरसारखे तंत्रज्ञान सर्व शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतील. यावेळी डॉ. गडाख यांनीही मार्गदर्शन केले. मान्यवरांनी यावेळी आचार्य पदवीच्या विद्यार्थ्यांबरोबर संवाद साधला. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ यांनी केले. कास्ट प्रकल्पाचा आढावा प्रकल्पाचे प्रमुख समन्वयक डॉ. सुनील गोरटीवार यांनी सादर केला. डॉ. मिलिंद अहिरे यांनी आभार तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. एम. जी. शिंदे यांनी केले. यावेळी सर्व विभाग प्रमुख, कास्ट प्रकल्पातील सर्व कास्ट मेंबर व संशोधन सहयोगी उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या पूर्वी मान्यवरांनी कास्ट – कासम प्रकल्पाद्वारे तयार केलेल्या नाविन्यपूर्ण अविष्कारांची पाहणी केली. मान्यवरांनी कास्ट प्रकल्पाचे हवामान अद्ययावत प्रक्षेत्र व हवामान अद्ययावत डिजिटल गाव बाबुर्डी घुमट याठिकाणी भेट दिली. यावेळी कास्ट प्रकल्पाद्वारे राबविण्यात येणाऱ्या स्वयंचलित हवामान केंद्र आणि स्वयंचलित पंप प्रणालीस भेटी प्रसंगी बाबुर्डी घुमटचे सरपंच श्री. जनार्दन माने यांनी मान्यवरांचे स्वागत करून सत्कार केला व गावाविषयी माहिती दिली. यावेळी मान्यवरांनी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

मफुकृवि ई वार्ता
ऑक्टोबर २०२१
महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
वर्ष :१, अंक क्रं. : १०,ऑक्टोबर, २०२१

## नवी दिल्ली येथील कार्यक्रमात राहुरी कृषि विद्यापीठाच्या तीन पुस्तकांचे विमोचन




**दि. १२ ऑक्टोबर, २०२१.** भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली येथे भारतातील कृषि विद्यापीठांच्या कुलगुरुंची वार्षिक परिषद नुकतीच पार पडली. नवी दिल्ली येथील ए.पी. शिंदे परिसंवाद हॉलमध्ये झालेल्या या वार्षिक परिषदेत भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे महासंचालक व कृषि संशोधन व शिक्षण विभागाचे सचिव डॉ. टी. महापात्रा यांच्या शुभहस्ते महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या तीन पुस्तकांचे विमोचन करण्यात आले. यावेळी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील, आर.पी.सी.ए.यु., पुसा येथील कुलगुरु डॉ. आर.सी. श्रीवास्तव व भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे कृषि शिक्षण विभागाचे उपमहासंचालक डॉ. आर.सी. अग्रवाल उपस्थित होते. यामध्ये पहिले पुस्तक, महात्मा फुले कृषि विद्यापीठाने प्रसारीत केलेल्या हरभरा, ऊस व डाळिंब या पिकांचे मुल्यांकन परिणाम लेखक डॉ. व्ही.जी. पोखरकर, डॉ. डी.बी. यादव, श्री. सी.एम. गुळवे आणि डॉ. डी.जे. सानप, दुसरे पुस्तक हवामान स्मार्ट डिजीटल शेती गाव : महात्मा फुले कृषि विद्यापीठाचा पुढाकार लेखक डॉ. सुनिल गोरंटीवार, डॉ. प्रभात कुमार, डॉ. एम.जी. शिंदे, डॉ. आर.पी. आंधळे, डॉ. ए.ए. अत्रे आणि डॉ. एस.ए. कदम आणि तिसरे पुस्तक डिजीटल कृषि तंत्रज्ञान : कृषि व्यवस्थापन प्रणालीची योग्य वेळ लेखक डॉ. सुनिल गोरंटीवार, डॉ. एस.ए. कदम, डॉ. सुधीर दहिवाळकर, डॉ. एम.जी. शिंदे, डॉ. पी.जी. पोपळे व डॉ. प्रभात कुमार या तीन पुस्तकांचे विमोचन या कार्यक्रमात करण्यात आले. या वार्षिक परिषदेच्या उद्घाटन कार्यक्रम प्रसंगी केंद्रिय कृषि व शेतकरी कल्याण मंत्री व भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या संस्थेचे अध्यक्ष श्री. नरेंद्र सिंह तोमर हे प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित होते. यावेळी शेतकरी कल्याण व कृषि राज्यमंत्री श्री. कैलाश चौधरी, भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे सचिव व कृषि संशोधन व शिक्षण विभागाचे अतिरीक्त सचिव श्री. संजय गर्ग उपस्थित होते. कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी सदरील पुस्तकांच्या सर्व लेखकांचे अभिनंदन केले.

मफुकृवि ई वार्ता
ऑक्टोबर २०२१
महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
वर्ष :१, अंक क्र. : १०,ऑक्टोबर, २०२१

## विक्रमी ऊस उत्पादन देणारे सर्व वाण राहुरी कृषि विद्यापीठाचे : कुलगुरुंनी केला शेतकऱ्यांचा सत्कार



**दि. ११ ऑक्टोबर, २०२१.** सांगली जिल्ह्यातील कुंडल येथील क्रांतिअग्रणी डॉ. जी.डी. बापू लाड सहकारी साखर कारखाना कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादन वाढीच्या कार्यक्रमास गती मिळावी व शेतकऱ्यांमध्ये उच्चांकी उत्पादन घेण्यासाठी निकोप स्पर्धा निर्माण व्हावी यासाठी दरवर्षी हंगामनिहाय एकरी विक्रमी ऊस उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांचा सहकुटुंब गौरव केला जातो. सन २०२०–२१ या कालावधीत ऊस पुरवठा केलेल्या पुरस्कार प्राप्त शेतकऱ्यांचा पुरस्कार वितरण व गुणगौरव सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणुन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्याचे विधान परिषद सदस्य तथा क्रांती उद्योग व शिक्षण समुहाचे प्रमुख आ. श्री. अरुण (अण्णा) लाड, भाभा अणु संशोधन केंद्र, मुंबईचे माजी शास्त्रज्ञ पद्मश्री डॉ. श्री. शरद काळे उपस्थित होते. यावेळी झालेल्या कार्यक्रमात सन २०२०–२१ या गळीत हंगामात हंगामनिहाय कारखाना कार्यक्षेत्रातील प्रति एकरी जास्त ऊस उत्पादन घेतलेल्या शेतकऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यामध्ये आडसाली हंगामात को–८६०३२ वाणाचे श्री. प्रकाश चव्हाण (तांदळगाव) यांनी प्रति एकरी ११३ मे. टन, श्री. भगवान होनमाने (देवराष्ट्रे) यांनी १११ मे. टन आणि श्री. केदारी कदम (शेळकबाव) यांनी १०४ मे. टन इतके विक्रमी उत्पादन घेतले आहे. पुर्व हंगामात श्री. मोहन जगदाळे (आंधळी) यांनी फुले १०००१ या वाणाचे प्रति एकरी ९३ मे. टन, श्री. नानासो चव्हाण (तांदळगांव) यांनी ८७ मे. टन आणि श्री. राजाराम पाटील (बोरगांव) यांनी को–८६०३२ या वाणाचे प्रति एकरी ८१ मे. टन इतके विक्रमी उत्पादन घेतले आहे. सुरु हंगामात श्री. कृष्णा भोसले (बांबवडे) यांनी को–८६०३२ या वाणाचे प्रति एकरी ७६ मे. टन, श्री. प्रशांत चौगुले (भिलवडी) यांनी फुले १०००१ या वाणाचे प्रति एकरी ६२ मे. टन आणि श्री. भिकू जाधव (हिंगणगांव) यांनी फुले ०२६५ या वाणाचे प्रति एकरी ६१ मे. टन इतके विक्रमी उत्पादन घेतले आहे. खोडवा हंगामात को–८६०३२ वाणाचे श्री. आप्पासाहेब जाधव (आसद) यांनी प्रति एकरी ७१ मे. टन, श्री. अमर जाधव (कुंभारगांव) यांनी ६९ मे. टन आणि श्री. मारुती माळी (कुंडल) यांनी ६६ मे. टन इतके उत्पादन घेतले आहे. अशा प्रकारे महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या ऊस वाणांचे शेतकऱ्यांनी विक्रमी उत्पादन घेतले आहे. या निमित्त शेतकऱ्यांना व त्यांच्या कुटुंबीयांना गौरविण्यात आले.

शेतकऱ्यांना शेती करतांना अनंत अडचणींना तोंड द्यावे लागते. सध्या हवामान बदलाचा सर्वात मोठा फटका शेती आणि शेतकऱ्यांना बसत आहे. अशा प्रतिकुल परिस्थितीतही तंत्रज्ञानाच्या सहाय्याने आणि मोठ्या कष्टाने ऊस वाणांचे

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
वर्ष :१, अंक क्रं. : १०,ऑक्टोबर, २०२१

विक्रमी उत्पादन घेवून पुरस्काराला पात्र ठरलेले शेतकरी खरोखरच कौतुकास पात्र आहेत. या सर्व शेतकऱ्यांनी राहुरी कृषि विद्यापीठाच्या अंतर्गत असलेल्या पाडेगाव ऊस संशोधन केंद्राने तयार केलेल्या उसाच्या वाणांची निवड केलेली आहे. यामुळे पर्यायाने सर्वोत्कृष्ट ऊस वाण तयार करणारे पाडेगाव ऊस संशोधन केंद्रातील शास्त्रज्ञांचाही गौरव झाला आहे असे मी समजतो असे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी केले. यावेळी कारखान्याचे उपाध्यक्ष श्री. उमेश जोशी, कार्यकारी संचालक श्री. चंद्रकांत गव्हाणे तसेच शेतकरी उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठामध्ये फळ प्रक्रिया केंद्राचे उद्घाटन





**दि. २१ ऑक्टोबर, २०२१.** शासन हे सरकारी–खाजगी भागीदारीसाठी प्रोत्साहन देते. या अनुषंगाने महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील काढणी पश्चात तंत्रज्ञान केंद्र हे सरकारी–खाजगी भागीदारीद्वारे भाडेतत्वावर लिलियम फुडस् प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीला चालविण्यास दिले आहे. या प्रकल्पाचे उद्घाटन कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या शुभहस्ते झाले. या केंद्रातून चिंच, पेरु, आंबा, आवळा या फळांचे ज्यूस उत्पादन सुरु झाले. यावेळी संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार, सहयोगी अधिष्ठाता (निकृशि) डॉ. श्रीमंत रणपिसे, कुलसचिव श्री. प्रमोद लहाळे, श्री. सुरेशराव शेटे, डॉ. सुनिल गोरंटीवार, डॉ. सचिन नलावडे, डॉ. कैलास कांबळे, डॉ. विक्रम कड उपस्थित होते. कुलगुरु डॉ. पाटील यावेळी म्हणाले आपल्या राज्यातील हवामान विविध फळे व भाजीपाला उत्पादनासाठी अनुकुल आहे. शेतकऱ्यांचा भाजीपाला तसेच फळे यांच्या हाताळणीमध्ये, वाहतूकीमध्ये तसेच साठवणुक करतांना फार मोठ्या प्रमाणात नुकसान होते. हेच नुकसान टाळायचे असेल तर त्यावर प्रक्रिया करणे हाच चांगला पर्याय आहे. फळ प्रक्रिया पदार्थांना राज्यातच नव्हे तर देशात तसेच परदेशातही मोठी मागणी आहे. यावेळी लिलियम फुडस् प्रायव्हेट लिमिटेडचे संस्थापक श्री. सुरेशराव शेटे म्हणाले या केंद्रातून विविध फळे, भाजीपाल्याचे, प्रक्रियायुक्त पदार्थ तसेच ज्यूस, सरबत, सीरफ, स्क्वॅश, जाम, कॅन्डी असे प्रक्रियायुक्त पदार्थ तयार करण्यात येणार आहेत.

## डॉ. सदामते यांचे विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन



**दि. २२ ऑक्टोबर, २०२१.** कृषि विस्तार सेवा ही पारदर्शक, प्रभावी आणि शेतकऱ्यांच्या गरजेवर आधारीत असावी. राज्य–केंद्र–स्वयंसेवी संस्था व खाजगी संस्था यांच्या एकत्रित समन्वयाने कृषि विस्ताराचे प्रभावी प्रारुप (मॉडेल) गरजेचे असल्याचे प्रतिपादन जेष्ठ कृषि विस्तार तज्ञ तथा माजी सल्लागार, कृषि, नियोजन आयोग, भारत सरकार डॉ. व्ही.व्ही. सदामते यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे आयोजीत कृषि विस्तारासाठी नाविन्यतेचे मार्ग या विषयावर मार्गदर्शन करतांना डॉ. सदामते बोलत होते. अध्यक्षस्थानी कृषि विस्तार व संज्ञापन विभाग प्रमुख डॉ. मिलिंद अहिरे होते. याप्रसंगी डॉ. सदामते पुढे म्हणाले की कृषि विद्यापीठे, कृषि विज्ञान केंद्रे, कृषि विभाग, कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन संस्था, कृषि महामंडळे, स्वयंसेवी संस्था, समाज माध्यमे व प्रसिध्दी माध्यमे यांचे योगदान सातत्याने कृषि विकासामध्ये असल्याने देश अन्नधान्य उत्पादनामध्ये स्वयंपूर्ण झाला आहे. यापुढे शाश्वत कृषि विकासासाठी शेतकरी उत्पादक कंपनी, कृषि उद्योजकता, विपणन माहिती तंत्रज्ञान व समाज माध्यमांचा प्रभावी अवलंब होण्यासाठी कृषि विद्यापीठांनी नेतृत्वाची भूमिका बजावणे गरजेचे आहे. या प्रसंगी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील प्राध्यापक, शास्त्रज्ञ व विद्यार्थी ऑनलाईन उपस्थित होते. स्वागत व प्रास्ताविक डॉ. मिलिंद अहिरे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आनंद चवई यांनी तर आभार डॉ. गोरक्ष ससाणे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी डॉ. मनोहर धादवड व डॉ. ज्ञानदेव फराटे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमासाठी डॉ. सुनिल भणगे, डॉ. पंडित खर्डे, डॉ. गोकुळ वामन, डॉ. भगवान देशमुख, डॉ. सचिन सदाफळ व विद्यार्थी उपस्थित होते.

## कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांची जीवाणू खते उत्पादन प्रकल्पाला भेट



**दि. २ ऑक्टोबर, २०२१.** जिवाणू खतांना सेंद्रीय शेतीमध्ये अनन्यसाधारण असे महत्व आहे. जिवाणू खतांमुळे पिकांची उगवण क्षमता वाढते, पिकांची भरघोस वाढ होते आणि उत्पन्नामध्ये १० ते १२ टक्यांनी वाढ होते तसेच रासायनिक खतांची २० ते २५ टक्यापर्यत बचत हाते. या खतांच्या वापरामुळे जमिनीचे भौतिक, रासायनिक आणि जैविक गुणधर्मामध्ये सुधारणा होते. या करिता जिवाणू खतांचा वापर शेतकऱ्यांनी वाढवावा असे आवाहन कुलगुरु डॉ. पी. जी. पाटील यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठाअंतर्गत वनस्पती रोगशास्त्र व कृषि अणुजीवशास्त्र विभागत जिवाणू खते उत्पादन प्रकल्प कार्यरत आहे. या प्रकल्पास महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी. जी. पाटील यांनी सदिच्छा भेट दिली. त्यांच्या बरोबर विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. शरद गडाख, अधिष्ठाता डॉ. प्रमोद रसाळ, वनस्पती रोगशास्त्र व कृषि अणुजीवशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. तानाजी नरुटे, प्रकल्प प्रमुख डॉ. आण्णासाहेब नवले, डॉ संजय कोळसे उपस्थित होते. यावेळी संशोधन संचालक डॉ. शरद गडाख म्हणाले की दिवसेंदिवस रासायनिक खते वापरुन जमिनीचा सामू वाढला असुन जमिनीतील सेंद्रीय कर्बाचे प्रमाण कमी झालेले आहे. त्यासाठी जैविक खते त्यावर उत्तम उपाय असुन त्याच्या वापरामुळे जमिनीच्या सर्व गुणधर्मामध्ये सुधारणा होते. महात्मा फुले कृषि विद्यापीठ पुर्वीपासून गुणवत्ता पुर्वक जैविक खतांची निर्मिती करत असुन शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त जैविक खतांचा वापर केला पाहिजे. ही जैविक खते पावडर व द्रवरुप स्वरुपात उपलब्ध असुन विद्यापीठाचे विक्री केंद्र आणि वनस्पती रोगशास्त्र विभाग, मफुकृवि, राहुरी तसेच विद्यापीठाचे कार्यक्षेत्रातील १० जिल्हयात २८ विक्री केंद्रांवर उपलब्ध आहे. विद्यापीठाची ही जैविक खते दर्जेदार असुन शेतकऱ्यांमध्ये अधिक लोकप्रिय होत आहेत त्यामुळे विक्रीमध्ये सातत्याने वाढ होत आहे. नत्र स्थिरीकरण जिवाणू, रायझोबियम, अझोटोबॅक्टर, असेटोबॅक्टर तसेच स्फुरद  विरघळणारे जिवाणू (पीएसबी), पालाश विरघळणारे जिवाणू (केएसबी), जैविक रोग नियंत्रक ट्रायकोडर्मा आणि कंपोस्ट कल्चर इत्यादी घटकांची निर्मिती या प्रकल्पामधून केली जाते.

मफुकृवि ई वार्ता
ऑक्टोबर २०२१
महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
वर्ष :१, अंक क्रं. : १०, ऑक्टोबर, २०२१

## पाणी फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजीत भटकळ यांची कृषि विद्यापीठास भेट





**दि. ५ ऑक्टोबर, २०२१.** पाणी फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सत्यजीत भटकळ यांनी महात्मा फुले कृषि विद्यापीठाला भेट दिली. यावेळी संशोधन तथा विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख यांनी विद्यापीठाच्या वतीने त्यांचे स्वागत केले. श्री. भटकळ यांनी संशोधन संचालक डॉ. शरद गडाख यांच्या समवेत विद्यापीठाच्या विविध प्रकल्पांना भेट देवून पाहणी केली. आंतरविद्या जलसिंचन विभागाचे प्रमुख डॉ. महानंद माने यांनी सिंचन पार्कमध्ये पिकांच्या पाणी व्यवस्थापनासाठी आधुनिक सिंचन पध्दतींची माहिती त्यांनी दिली. कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राचे व्यवस्थापक डॉ. दत्तात्रय पाचारणे यांनी शेतकऱ्यांसाठी राबवत असलेल्या केंद्राच्या उपक्रमांची माहिती दिली. ज्वारी सुधार प्रकल्पाचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. दिपक दुधाडे यांनी ज्वारी प्रकल्पावर सध्या होत असलेल्या ज्वारी पिकातील संशोधनाची माहिती दिली. ज्वारी सुधार प्रकल्पावर नुकतीच मा. पंतप्रधानांच्या हस्ते लोकार्पण झालेल्या सी.एस.एच.–४७ या वाणाच्या प्रात्यक्षिक क्षेत्राला भेट दिली. औषधी व सुगंधी वनस्पती प्रकल्पाचे प्रमुख डॉ. विक्रम जांभळे यांनी विविध औषधी वनस्पतींची माहिती दिली. डॉ. विनायक जोशी यांनी फळबाग लागवड पीक प्रात्यक्षिके आणि कोरडवाहू फळे संशोधन प्रकल्पाच्या उपलब्धींची माहिती सादर केली. उद्यानविद्या रोपवाटीकेत आयोजीत प्रदर्शनात डॉ. सचिन मगर यांनी माहिती दिली. डॉ. भटकळ यांना गो संशोधन व विकास प्रकल्पात विद्यापीठ निर्मित फुले भुमित्र या गांडूळ खताची माहिती डॉ. महेंद्र मोटे यांनी दिली. कृषि विद्या विभाग प्रमुख डॉ. आनंद सोळंके आणि डॉ. उल्हास सुर्वे यांनी विद्यापीठाच्या सेंद्रिय संशोधन प्रकल्पाची माहिती दिली. बांबु संशोधन प्रकल्पाची माहिती डॉ. बाबासाहेब सिनारे आणि डॉ. सुमती दिघे यांनी दिली. या भेटीनंतर श्री. भटकळ यांनी विद्यापीठ कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या कुशल नेतृत्वाखाली शेतकऱ्यांसाठी करत असलेल्या कार्याबद्दल आणि संशोधनाबद्दल समाधान व्यक्त केले. तसेच महात्मा फुले कृषि विद्यापीठ आणि पाणी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शेतकऱ्यांसाठी अधिक चांगले उपक्रम राबविण्याचा दृढ विश्वास व्यक्त केला. या भेटीच्या वेळी प्रसारण केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. पंडित खर्डे, जनसंपर्क अधिकारी डॉ. गोकुळ वामन उपस्थित होते.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
वर्ष :१, अंक क्रं. : १०, ऑक्टोबर, २०२१

## बेकरी युनिटची पाहणी





**दि. ५ ऑक्टोबर, २०२१.** महात्मा फुले कृषि विद्यापीठातील अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभागामार्फत चालविल्या जाणाऱ्या बेकरी युनिटमध्ये दर्जेदार उत्पादने तयार होत आहेत. या बेकरी युनिटमध्ये तयार होणाऱ्या औषधाच्या स्वरुपात अन्न या प्रकारात फुले शतावरी, फुले अश्वगंधा, फुले आवळा, फुले पुदिना व फुले बेहडा या कुकिजचे उत्पादन केले जाते. आपल्या आरोग्याच्या दुष्टीने महत्वाच्या असणाऱ्या या कुकिजचा तसेच या युनिटमध्ये तयार होणाऱ्या इतर पदार्थांचा उपयोग विद्यापीठातील व इतर सर्व लोकांनी खाद्यअन्न म्हणुन करावा असे आवाहन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठातील बेकरी युनिटला कुलगुरु डॉ. पाटील यांनी भेट दिली. त्यावेळी ते बोलत होते. या बेकरी युनिटमध्ये अद्ययावत उपकरणांच्या मदतीने स्वच्छ व सुरक्षीत वातावरणात शास्त्रीय पध्दतीने ब्रेड, बनपाव, नानकटाई, सुरती बटर, मिल्क टोस्ट, नाचणी बिस्कीट व आयुर्वेदिक कुकिज इ. उत्पादने तयार केली जातात. तसेच या युनिटमार्फत फळे व भाजीपाला प्रक्रिया तंत्रज्ञान तसेच बेकरी तंत्रज्ञान असे एक महिना कालावधीचे दोन ट्रेनिंग सुशिक्षीत बेरोजगारांना दिले जाते व त्यामार्फत त्यांना स्वतःचा व्यवसाय सुरु करण्याचे प्रशिक्षण दिले जाते. आतापर्यंत जवळजवळ ६६१ लोकांनी फळे व भाजीपाला प्रक्रिया तंत्रज्ञान यावरील प्रशिक्षण घेवून त्यातील ३० व्यक्तींनी स्वतःचा व्यवसाय सुरु केलेला आहे. बेकरी तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण २३५ युवकांनी पुर्ण करुन १५ युवकांनी स्वतःचा बेकरी व्यवसाय सुरु करुन इतरांना रोजगाराची संधी उपलब्ध करुन दिलेली आहे अशी माहिती अन्नशास्त्र व तंत्रज्ञान विभागाचे प्रमुख डॉ. उत्तम चव्हाण यांनी यावेळी दिली. अतिशय कमी मनुष्यबळामध्ये या विभागाने अतिशय चांगले काम शेतकऱ्यांसाठी, बेरोजगार युवकांसाठी, महिला बचट गटासाठी तसेच काही शासकीय अधिकाऱ्यांसाठी केलेले आहे. त्यामुळे त्यांच्या कार्याचे मा. कुलगुरुंनी कौतुक केले व इतर विभागांनीही असेच उल्लेखनीय काम करावे अशी आशा कुलगुरु डॉ. पाटील यांनी व्यक्त केले.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
वर्ष :१, अंक क्रं. : १०,ऑक्टोबर, २०२१

## छोट्या गोपालकाच्या भेटीला आले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु



**दि. १३ ऑक्टोबर, २०२१.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरीचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी सांगली जिल्ह्यातील कुंडल येथील छोट्या गोपालक कु. राजवीर स्मिता रविंद्र लाड यांच्या घरी खास करून भेट देऊन खिलार, कोकण कपिला या त्याच्या लाडक्या गाईची पाहणी केली. गेल्या आठवड्यामध्ये सकाळ ॲग्रोवन यांनी गोधन विशेषांक सादर केला. त्यामध्ये देशी गाईंचे महत्त्व नमूद केले. सदर पुरवणी अंकामध्ये डॉ. सोमनाथ माने, प्रमुख शास्त्रज्ञ, देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्र, कृषि महाविद्यालय, पुणे यांनी गोपर्यटनावरती एक लेख लिहिला होता व त्या लेखाच्या शिर्षकामध्ये या छोट्या गोपालकाचा फोटो पाहिला होता. स्वतः कृषि विद्यापीठाचे कुलगुरू यांनी सदर गोपालकाची पूर्ण माहिती काढून स्वतः ते भेटीला गेले. खरंतर देशी गाईंचे संवर्धन करण्यासाठी लहानपणापासूनच असे छोटे गोपालक तयार झाले तर नक्कीच देशी गोपालनाला सोनेरी दिवस येऊन पुढच्या पिढीसाठी आदर्श निर्माण होतील अशी आशा त्यांनी व्यक्त केली. देशी गोपालन फक्त दुधापुरते मर्यादित नसून ती आपली संस्कृती आहे व कुटुंबाचे आरोग्य, जमिनीचे आरोग्य व निसर्गाचा समतोल राखण्याचे काम देशी गाई करत आहे. कृषि महाविद्यालय, पुणे येथे देशी गाई संशोधन व प्रशिक्षण केंद्र अंतर्गत विविध देशी गाईंचे संशोधन व प्रशिक्षण कार्य विद्यापीठाने हाती घेतलेले आहे. त्यामुळे विद्यापीठाच्या परिसरातील शेतकरी गोपालकांना त्याचा नक्कीच लाभ होणार आहे. तसेच दुधाच्या देशी गाईंबरोबर आपल्या पश्चिम महाराष्ट्रातील प्रसिद्ध असलेल्या खिलार गाईंचे सुद्धा संवर्धन होणे अत्यंत महत्त्वाचे आहे असे त्यांनी नमूद केले.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात इरिकॅड सॉफ्टवेअरचे दोन आठवड्याचे प्रशिक्षण संपन्न



**दि. ७ ऑक्टोबर, २०२१.** डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय यांचा जलसिंचन व निचरा अभियांत्रिकी विभाग आणि हवामान अद्ययावत शेती व जलव्यवस्थापनाचे आधुनिक कृषि विज्ञान व तंत्रज्ञान केंद्र, महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरी यांच्या संयुक्त विद्यमाने दोन आठवड्याचे प्रशिक्षण महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे आयोजीत करण्यात आले होते. सदर प्रशिक्षणाचा विषय प्राध्यापक व शैक्षणीक कर्मचाऱ्यांची श्रेणी सुधारण्यासाठी त्यांना इरिकॅड सॉफ्टवेअरचे प्रगत तंत्रज्ञान देणे हा होता. जलसिंचन व निचरा अभियांत्रिकी विभाग आणि मृद व जलसंधारण अभियांत्रिकी विभाग यांच्या शैक्षणिक कर्मचारी वर्गाला जलसिंचन तंत्रज्ञानातील अत्याधुनिक तंत्र प्रणाली व त्यांचा वापर या बाबत सजग आणि प्रशिक्षित करणे, तसेच लिंक्लोन अग्रिटेक, न्यूझीलंड यांच्याद्वारे विकसीत इरिकॅड प्रणाली याचे प्रात्यक्षिक उपलब्ध करून देणे, ही ह्या प्रशिक्षणाची उद्दिष्टे होती.

इरिकॅड प्रणाली ही नलिका जलसिंचन पद्धतीच्या क्षेत्रातील प्रारूप रेखांकनामध्ये संपूर्ण जगात मोठ्या प्रमाणावर वापरली जाते. ह्याचा वापर छोट्या शेती क्षेत्राच्या ठिबक सिंचन पासून ते मोठ्या जलसिंचन प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रापर्यंत केला जातो. मुंबई येथील इरीकॅड प्रणाली रेखांकन प्रशिक्षक अभियंता श्री. एम.एस. कायंदे यांनी या प्रशिक्षणामध्ये इरिकॅड प्रणालीचे टूलबार, इरिकॅड रेखांकन सुविधा, जल पुरवठा असणाऱ्या सरल व्यवस्थेचा आराखडा तयार करणे, जलसिंचनासाठी योग्य त्या नलिकांची निवड करणे किंवा वाहकता आणि दाब यावर आधारित आकार निश्चिती करणे, साध्या टर्फ ची आखणी करणे विविध तुषार सिंचक व ठिबक सिंचन आराखडा विशिष्ट क्षेत्रासाठी जल पुरवठा निश्चिती करणे या विषयांवर मार्गदर्शन केले. डॉ. सुनिल गोरंटीवार यांनी फुले जल आणि फुले इरिगेशन शेड्युलर ह्या महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांच्याद्वारे विकसित करण्यात आलेल्या मोबाईल ॲप्लिकेशनची माहिती दिली आणि त्या विकसित केलेल्या प्लिकेशन्सचे इरिकॅड प्रणालीमध्ये, इरिकॅड द्वारे आरेखित केलेल्या शेतांच्या सिंचन वेळापत्रकासाठी एकात्मिकरण सुचविले. न्यूझीलंड येथील रेनर जलसिंचनचे माजी सिंचन आरेखन सल्लागार श्री. ग्रॅहम मॅकडॉगल हे ऑनलाइन पद्धतीने या बैठकीला उपस्थित होते. त्यांनी इरिकॅड प्रणालीची संभाव्यता आणि ठिबक सिंचनासह नलिका सिंचन प्रणालीच्या आरेखनामध्ये त्याची उपयोगिता यावर मार्गदर्शन केले. यावेळी आंतरविद्या शाखा जलसिंचन व्यवस्थापन विभागाचे प्रमुख

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
वर्ष :१, अंक क्रं. : १०,ऑक्टोबर, २०२१

डॉ. एम.एस. माने, कार्यक्रमाचे संयोजक व कास्ट प्रकल्पाचे प्रमुख संशोधक डॉ. सुनिल गोरंटीवार, राष्ट्रीय कृषि विकास योजना व इमी प्रकल्पाचे संशोधन सहयोगी या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी जलसिंचन व निचरा अभियांत्रिकी प्रमुख डॉ. एन एन फिरके आणि सह प्रमुख संशोधक डॉ एम. जी शिंदे यांनी सह संयोजक म्हणून जबाबदारी पार पाडली. या प्रशिक्षणाचे संयोजन सचिव म्हणुन जलसिंचन व निचरा अभियांत्रिकीचे सहयोगी प्राध्यापक डॉ. एस.बी. गाडगे यांनी काम पाहिले.

## मा. कुलगुरु यांची ज्वारी सुधार प्रकल्पाला भेट





**दि. १५ ऑक्टोबर, २०२१.** महाराष्ट्रामध्ये ज्वारीचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात असून दिवसेंदिवस लोकांमध्ये ज्वारीचे आहारातील महत्व लक्षात येवू लागले आहे. महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या ज्वारी सुधार प्रकल्पाने बागायती तसेच कोरडवाहू जमिनींसाठी ज्वारीचे वैशिष्ट्यपूर्ण असे विविध वाण आतापर्यंत विकसीत केलेले आहेत. यामुळे ज्वारी उत्पादक शेतकऱ्यांना फार मोठा दिलासा मिळालेला आहे. या प्रकल्पाने ज्वारीचे विविध वाण विकसीत करुन शेतकऱ्यांसाठी उल्लेखनीय कार्य केले असल्याचे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी केले. भारताचे मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी नुकतेच विविध पिकांचे वैशिष्ट्यपूर्ण असे ३५ वाण राष्ट्राला लोकार्पण केले. या वाणांमध्ये महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या ज्वारी सुधार प्रकल्पाने विकसीत केलेल्या सी.एस.एच.–४७ या वाणाचा समावेश आहे. या पार्श्वभूमीवर कुलगुरु डॉ. पाटील यांनी ज्वारी सुधार प्रकल्पाला भेट दिली. यावेळी त्यांच्या समवेत संशोधन संचालक डॉ. शरद गडाख हे होते. यावेळी वरिष्ठ ज्वारी पैदासकार डॉ. दिपक दुधाडे यांनी ज्वारी प्रकल्पाबद्दल माहिती दिली. डॉ. शरद गडाख यांनी ज्वारी प्रकल्पाने आतापर्यंत केलेल्या संशोधनाचा आढावा सादर केला. कुलगुरुंनी यावेळी ज्वारी सुधार प्रकल्पातील सर्व शास्त्रज्ञ, कर्मचारी व मजुरवर्ग यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल अभिनंदन केले व पुढील संशोधनासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी कुलगुरुंनी सी.एस.एच.–४७ या वाणाच्या प्रात्यक्षिक प्लॉटला भेट दिली. ज्वारी सुधार प्रकल्पावर नविनच सोलर उर्जेवर आधारीत कुंपन तयार करण्यात आले आहे. याचे उद्घाटन कुलगुरु डॉ. पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. ज्वारी किटकशास्त्रज्ञ डॉ. उत्तम कदम यांनी स्वागत तर डॉ. प्रमोद कोटेचा यांनी आभार व्यक्त केले. यावेळी विभाग प्रमुख डॉ. विजू अमोलीक तसेच प्रकल्पातील प्रा. सुदाम निर्मळ, डॉ. उदय दळवी, डॉ. मनाजी शिंदे, डॉ. जितेंद्र पाटील व इतर अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
वर्ष :१, अंक क्रं. : १०,ऑक्टोबर, २०२१

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात देशी गाईंचे भ्रूण प्रत्यारोपण तंत्रज्ञानाचा शुभारंभ





**दि. २९ ऑक्टोबर, २०२१.** कृषि महाविद्यालय, पुणे येथील देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्रातील गीर देशी गाईच्या भ्रूण प्रत्यारोपणाच्या तंत्रज्ञानाचा शुभारंभ महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या गो संशोधन व विकास प्रकल्पामध्ये संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख यांच्या हस्ते झाला. हे तंत्रज्ञान देशी गाईंचे संवर्धन करण्यासाठी महत्वाचे असून सदर भृण प्रत्यारोपण या तंत्रज्ञानाचा वापर राहुरी सिमेन स्टेशन, राष्ट्रीय डेअरी डेव्हलपमेंट बोर्ड यांच्या समन्वयाने होत आहे. याप्रसंगी डॉ. गडाख म्हणाले की या तंत्रज्ञानाचा विस्तार शेतकऱ्यांच्या शेतावरती झाल्यास दुग्धव्यवसाय व चांगल्या वंशावळीच्या देशी गाई निर्माण होण्यासाठी या तंत्रज्ञानाचा उपयोग होणार आहे. सदरचा प्रकल्प हा महाराष्ट्रामध्ये प्रथमच होत असून देशामध्ये शुद्ध जातीच्या गाई पैदाशीसाठी हे तंत्रज्ञान खूप महत्त्वाचे ठरणार आहे. महाराष्ट्रामध्ये देशी गोसंवर्धनाचे कार्य वेगाने होण्यासाठी हा प्रकल्प खूप महत्वाचा ठरणार असून शुद्ध जातींच्या गाईंची पैदास या तंत्रज्ञानाद्वारे जलद गतीने होणार आहे. याप्रसंगी राहुरी सिमेन स्टेशनचे जनरल मॅनेजर डॉ. शिवकुमार पाटील, डॉ. जनार्दन कातकडे, डॉ. देवेंद्र स्वामी, पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. दिनकर कांबळे, देशी गाय व संशोधन प्रकल्पाचे शास्त्रज्ञ डॉ. विष्णू नरवडे आणि डॉ. सुनील अडांगळे उपस्थित होते.

## कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या संकल्पनेतून अभ्यास दौरा संपन्न






**दि. ७ ऑक्टोबर, २०२१.** राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्प व भारतीय कृषि अनुसंधान परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने हवामान अद्ययावत शेती व जल व्यवस्थापनाचे आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञान केंद्र हे महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथे कार्यरत असून या प्रकल्पांतर्गत विद्यापीठातील शास्त्रज्ञ व विद्यार्थ्यांनी आधुनिक शेती तंत्रज्ञान पध्दतीचा वापर योग्य पद्धतीने करणाऱ्या पालेकरांच्या फार्मला तसेच अग्रेसर उद्योजक अवी ब्रॉयलरच्या नाशिक येथील युनिटला भेट दिली. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या संकल्पनेतून सदरच्या अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शास्त्रज्ञ व विद्यार्थ्यांनी पिंपळगाव बसवंत येथील श्री. किरण पालेकर यांच्या ग्राफटेक प्लांट्स, पालेकर फार्म्सला भेट दिली. त्यांनी ५३ एकरावर द्राक्षाची शेती आधुनिक पद्धतीने करत असताना सोबतच २४ ते २५ द्राक्षांच्या जातींचे कलम तयार करण्याचा व्यवसाय सुरु केला आहे. त्यासाठी त्यांनी एक वेगळ्या युनिटची स्थापना केली आहे. यावेळी त्यांनी द्राक्ष कलम तयार करण्याचे तंत्र सांगितले. एक कलम साधारणतः १२० ते १५० रुपयांना विकले जाते. सदर कलम तयार करण्याचे प्रशिक्षण त्यांनी विदेशातून घेतलेले आहे. शेतीला पूरक व्यवसाय म्हणून द्राक्ष कलम करणे हा सर्वोत्तम व्यवसाय असू शकतो असे त्यांनी सांगितले.

अवी ब्रॉयलरचे संस्थापक आणि अध्यक्ष श्री. श्रीकृष्ण गांगुर्डे यांच्या युनिटला भेट दिल्यानंतर विद्यापीठातील शास्त्रज्ञ व विद्यार्थ्यांबरोबर संवाद साधताना त्यांनी सांगितले की कुक्कुटपालन शेतीला पूरक व्यवसाय करण्याबरोबरच स्वतंत्रपणे व्यवसाय म्हणूनही करता येवू शकतो. यासाठी चिकाटी आणि येणाऱ्या काळातील आव्हाने ओळखणे, बाजारभावाचा अभ्यास करणे इ. गोष्टी आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. या युनिटमध्ये विद्यार्थ्यांना कच्चा माल साफ करणे, प्रक्रिया करणे, पॅलेटिंग, पॅकेजिंग आणि स्टोरेज असे सर्व टप्पे पाहायला मिळाले. कास्ट प्रकल्पाचे प्रमुख संशोधक डॉ. सुनील गोरंटीवार यांच्या मार्गदर्शनाखाली कास्ट प्रकल्पाचे सहप्रमुख संशोधक डॉ. मुकुंद शिंदे यांनी या अभ्यासदौऱ्याचे नियोजन केले. सदर अभ्यासदौऱ्यामध्ये विद्यापीठातील विविध विभागाचे १३ शास्त्रज्ञ व ३१ विद्यार्थी सहभागी झाले होते.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
वर्ष :१, अंक क्रं. : १०,ऑक्टोबर, २०२१

## डॉ. मिलिंद अहिरे डॉ. जी.एस. विद्यार्थी पुरस्काराने सन्मानीत




**दि. ८ ऑक्टोबर, २०२१.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या पद्व्युतर महाविद्यालयातील कृषि विस्तार व संज्ञापन विभाग प्रमुख आणि हळगाव येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. मिलिंद अहिरे यांना भारतीय विस्तार शिक्षण सोसायटीचा मानाचा समजला जाणारा डॉ. जी.एस. विद्यार्थी पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. हा पुरस्कार कृषि माहिती संवाद आणि विस्तार कार्यात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या विस्तार शास्त्रज्ञाला देण्यात येतो. उत्तर प्रदेशातील वाराणसी येथील बनारस हिंदू विद्यापीठात भारतीय विस्तार शिक्षण सोसायटीच्या राष्ट्रीय परिसंवादात उत्तर प्रदेश राज्याचे सामाजीक न्याय विभागाचे राज्यमंत्री मा. श्री. रविंद्र जैसवाल यांचे शुभहस्ते सदरचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी बांदा कृषि विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरु व भारतीय विस्तार शिक्षण सोसायटीचे अध्यक्ष डॉ. यु.एस. गौतम, भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या विस्तार विभागाचे उपमहासंचालक डॉ. ए.के. सिंग यावेळी उपस्थित होते. हा पुरस्कार मिळाल्यामुळे डॉ. अहिरे यांचे महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## विद्यापीठातील शास्त्रज्ञ विविध पुरस्काराने सन्मानीत







**दि. ८ ऑक्टोबर, २०२१.** उत्तर प्रदेशातील वाराणसी येथील बनारस हिंदू विद्यापीठात भारतीय विस्तार शिक्षण सोसायटीच्या राष्ट्रीय परिसंवादात महात्मा फुले कृषि विद्यापीठातील दोन शास्त्रज्ञांना पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. यामध्ये धुळे कृषि महाविद्यालयातील कृषि विस्तार व सज्ञापन विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. संदीप पाटील यांना नवी

दिल्ली येथील भारतीय विस्तार शिक्षण संस्थेचा अतिशय प्रतिष्ठीत समजला जाणारा यंग सायंटिस्ट पुरस्काराने तर महात्मा फुले कृषि विद्यापीठातील कृषि विस्तार व सज्ञापन विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. आनंद चवई यांना परिसंवादात उत्कृष्ठ पोस्टर सादरीकरणाबद्दल पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. सदरचे पुरस्कार उत्तरप्रदेश राज्याचे सामाजीक न्याय राज्यमंत्री मा. श्री. रविंद्र जैसवाल यांचे शुभहस्ते प्रदान करण्यात आले. यावेळी बांदा कृषि विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरु व भारतीय विस्तार शिक्षण सोसायटीचे अध्यक्ष डॉ. यु.एस. गौतम, भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या विस्तार विभागाचे उपमहासंचालक डॉ. ए.के. सिंग उपस्थित होते.

## कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथे प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन






**दि. ऑक्टोबर २०२१.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ अंतर्गत कृषि विज्ञान केंद्र, धुळे यांचे माध्यमातून तीन दिवसीय पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय या विषयावर प्रशिक्षण आयोजन करण्यात आले. सदर प्रशिक्षण उदघाटन कार्यक्रमास कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. चिंतामणी देवकर, नंदुरबार कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सातप्पा खरबडे, कृषि तंत्र विद्यालयाचे प्राचार्य डॉ. राहुल देसले, कृषि विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ. दिनेश नांद्रे, डॉ धनराज चौधरी उपस्थित होते. या प्रशिक्षणाचे प्रास्ताविक डॉ. दिनेश नांद्रे यांनी केले. प्रमुख मार्गदर्शनामध्ये डॉ.चिंतामणी देवकर यांनी पशुसंगोपनातून शाश्वत उत्पन्न कसे घेता येऊ शकते या विषयी अहमदनगर जिल्ह्याचे उदाहरण देऊन उपस्थितांना मार्गदर्शन केले. डॉ. सातप्पा खरबडे यांनी स्वानुभवातून पशुसंगोपनाचे महत्व सांगितले. डॉ. राहुल देसले यांनी पशुधन सध्यस्थिती, भारतीय अर्थव्यवस्थेमधील पशुधनाचे महत्व आणि भविष्यातील संधी या विषयी मार्गदर्शन केले. तांत्रिक सत्रात श्री. विपुल वसावे, डॉ. विष्णू नरवाडे, श्री. शांताराम मालपुरे व श्री. नरेंद्र पाटील यांचे मार्गदर्शन मिळाले. सदर तीन दिवसीय चर्चासत्रामध्ये भारतातील गाई व म्हशी यांच्या जाती व त्यांचे वैशिष्ट्ये, जनावरांची काळजी, निगा, लसीकरण व रोग व्यवस्थापन, नवजात वासरांचे संगोपन, आहार व्यवस्थापन, चारा उत्पादन तंत्र, मुरघास, हायड्रोपोनिक चारा उत्पादन तंत्रज्ञान, स्वच्छ दुध उत्पादन तंत्रज्ञान, खरेदी विक्री व्यवस्थापन, पशुसंवर्धनमधील विविध शासकीय योजना, प्रकल्प अहवाल तयार करावयाची माहिती, गट शेती संकल्पना व महत्व, गोठा व्यवस्थापन या विषयांवर मार्गदर्शन केले. सदर प्रशिक्षणात बोरकुंड,शिरपूर, धुळे येथील ग्रामीण युवक, शेतकरी यांनी सहभाग नोंदवला. या प्रशिक्षणाचे सूत्रसंचालन डॉ. धनराज चौधरी यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री. रोहित कडू व डॉ. अतिश पाटील यांनी मानले.

## शेतकरी प्रथम प्रकल्पांतर्गत प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न





**दि. १४ ऑक्टोबर, २०२१.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ अंतर्गत कार्यरत असलेल्या नवी दिल्लीच्या भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या शेतकरी प्रथम प्रकल्पांतर्गत आणि कृषि विभागाच्या सहकार्याने आयोजीत रब्बी ज्वारी व हरभरा उत्पादन तंत्रज्ञान या विषयावरील प्रशिक्षण कार्यक्रम राहुरी तालुक्यातील कानडगाव या ठिकाणी आयोजीत केला गेला. यावेळी प्रकल्पाचे प्रमुख समन्वयक डॉ. पंडित खर्डे, कडधान्य सुधार प्रकल्पाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. नंदकुमार कुटे, ज्वारी सुधार प्रकल्पाचे संशोधन सहयोगी डॉ. सुरज गडाख, मंडल कृषि अधिकारी श्री. जयंत जाधव, कानडगावचे उपसरपंच श्री. मधुकर गागरे, प्रकल्पाचे सहसमन्वयक डॉ. भगवान देशमुख, डॉ. सचिन सदाफळ, कृषि सहाय्यक श्री. दुर्वेश पाटील, मेजर ताराचंद गागरे उपस्थित होते.

सुरुवातीला प्रकल्प समन्वयक डॉ. पंडित खर्डे यांनी सर्वांचे स्वागत करुन आपल्या प्रास्ताविकात शेतकरी प्रथम प्रकल्पाची उद्दिष्ट्ये व उपलब्धी विषद केली. हरभरा उत्पादन तंत्रज्ञानाबाबत डॉ. नंदकुमार कुटे म्हणाले की शेतकऱ्यांनी पेरणी अगोदर बीज प्रक्रिया करणे गरजेचे आहे. विद्यापीठाने विकसित केलेल्या फुले विक्रम, फुले विक्रांत आणि कोरडवाहूसाठी फुले विश्वराज या वाणांचा वापर करावा. डॉ. सुरज गडाख यांनी शेतकऱ्यांना रब्बी ज्वारीच्या अधिक उत्पादनासाठी पंचसूत्री तंत्रज्ञानाबाबत माहिती दिली. यामध्ये पेरणी अगोदर ओलावा व्यवस्थापन, जमिनीच्या प्रकारानुसार वाणांचा वापर, पेरणीची वेळ, आंतरमशागत, पाणी व खत व्यवस्थापन आणि रोग व कीड नियंत्रणाबाबत डॉ. गडाख यांनी मार्गदर्शन केले. यावेळी श्री. जयंत जाधव यांनी कृषि विषयक योजनांची माहिती दिली. उपसरपंच श्री. मधुकर गागरे यावेळी म्हणाले की शेतकऱ्यांनी प्रगती साधायची असेल तर शास्त्रीयदृष्ट्या शेती करावी, पाण्याच्या उपलब्धतेनूसार पिकांचे नियोजन करावे. यावेळी चिंचविहिरेचे शेतकरी श्री. मारुती गिते आणि कणगरचे शेतकरी श्री. प्रविण गाडे यांनी शेतकरी प्रथम प्रकल्पाबद्दलचे आपले स्वानुभव सांगितले. यावेळी प्रातिनिधीक स्वरुपात निविष्ठांचे वाटप करण्यात आले. सहसमन्वयक डॉ. भगवान देशमुख यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर वरिष्ठ संशोधन सहयोगी श्री. विजय शेडगे यांनी आभार मानले. प्रशिक्षण कार्यक्रमाला कानडगाव, तांभेरे, चिंचविहिरे व कणगर गावातील शेतकरी उपस्थित होते. कार्यक्रमाअगोदर तज्ञांनी सोयाबीन आणि तूर प्रात्यक्षिक क्षेत्राला भेटी दिल्या. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी विजय शेडगे, किरण मगर आणि राहुल कोऱ्हाळे यांनी परिश्रम घेतले.

मफुकृवि ई वार्ता
ऑक्टोबर २०२१
महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
वर्ष :१, अंक क्रं. : १०,ऑक्टोबर, २०२१

## भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती साजरी



**दि. १६ ऑक्टोबर, २०२१.** डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या स्वप्नातील भारत निर्माण करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांवर आहे. त्यासाठी त्यांनी विज्ञाननिष्ठा व कष्ट करण्याची तयारी ठेवावी. स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करून आयुष्यात सर्वगुणसंपन्न नागरिक बना असे प्रतिपादन कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. अमोल जत्राटकर यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील हाळगावच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालयात भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी सहयोगी अधिष्ठाता डॉ. मिलिंद अहिरे यांच्या शुभहस्ते भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. महाविद्यालयाचे शिक्षकवर्गीय कर्मचारी तसेच शिक्षकेतर कर्मचारी या कार्यक्रमाला उपस्थित होते. या कार्यक्रमानंतर सर्व विद्यार्थ्यांबरोबर ऑनलाइन पद्धतीने वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन करताना डॉ. अमोल जत्राटकर बोलत होते. यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. अहिरे म्हणाले की आपण वाचन केले तर आपले विचार प्रगल्भ होतील. विद्यार्थ्यांनी एका आठवड्यात एक पुस्तक नक्की वाचावे ज्यामुळे जीवन घडण्यामध्ये त्याचा विद्यार्थ्यांना नक्की उपयोग होईल. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांची ओळख प्रा. कीर्ती भांगरे यांनी करून दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाविद्यालयाचे विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. सखेचंद अनारसे यांनी केले.

## पुणे कृषि महाविद्यालयाच्या विद्यार्थिनीची नेदरलँड येथे पदव्युत्तर शिक्षणासाठी निवड



**दि. १ ऑक्टोबर, २०२१.** पुणे कृषि महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. अंचू रेगी हीने कृषि पदवीच्या शेवटच्या वर्षात असताना व्यागनिनजन विद्यापीठ, नेदरलँड येथील पदव्युत्तर शिक्षणासाठीची प्रवेश परीक्षा दिली होती. त्यामध्ये ती उत्तीर्ण झाली असून तिची निवड पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी झाली आहे. सदर विद्यार्थीनी केरळ राज्यातील इड्डुक्की जिल्ह्यातील आहे. तिला कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य तथा सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुनील मासाळकर, विद्याथी कल्याण अधिकारी डॉ. प्रमोद पाटील आणि मार्गदर्शक डॉ. दत्तात्रय सोनावणे यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांनी तिला शुभेच्छा दिल्या.

## कृषि संशोधन केंद्र, लोणावळामार्फत प्रशिक्षण कार्यक्रमाचे अयोजन



**दि. ९ ऑक्टोबर, २०२१.** आधुनिक शेतीकडे शेतकऱ्यांनी वळावे तसेच शेतीपुरक व्यवसाय सुरु करुन सेंद्रिय शेती करण्यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन जिल्हा परिषद सदस्य श्री. भाई भरत मोरे यांनी मोहितेवाडी येथे शेतकऱ्यांशी बोलतांना केले. कृषि संशोधन केंद्र, लोणावळा यांच्या वतीने मोहितेवाडी येथे प्रगतशील शेतकरी श्री. दत्तात्रय निम्हण यांच्या शेतात सदरच्या प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. किरण रघुवंशी मार्गदर्शन करतांना म्हणाले की शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब आपल्या शेतीत केला पाहिजे. यावेळी संजय गांधी निराधार योजनेचे अध्यक्ष श्री. नारायण ठाकर, ह.भ.प. श्री. महादू सातकर, श्री. बंडोबा सातकर, श्री. महादेव भोते, श्री. गुलाबराव तिकोणे, श्री. मारुती आगळमे, श्री. गोरख आगळमे, श्री. दिलीप गावडे, श्री. कैलास घारे, श्री. अनिल गरवड, श्री. वाघु चोपडे यांच्यासह परिसरातील शेतकरी उपस्थित होते. या  चर्चासत्राचे नियोजन श्री. दत्तात्रय निम्हण व श्री. नंदकुमार पदमुले यांनी केले.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
वर्ष :१, अंक क्रं. : १०,ऑक्टोबर, २०२१

## नोव्हेंबर महिन्यातील कामांचा तपशील

### भुईमूग (उन्हाळी)

- भुईमूग लागवडीसाठी मध्यम खोल, उत्तम निचऱ्याची जमीन निवडावी.
- खरीप हंगामातील पीक निघाल्यानंतर जमिनीची खोल नांगरट करावी. त्यानंतर तीन ते चार कुळवण्याकरून ढेकळे फोडून जमीन भुसभुशीत करावी. शेवटच्या कुळवणीपूर्वी हेक्टरी १० टन चांगले कुजलेले शेणखत अगर कंपोस्ट खत पसरावे.

### बागायती कापूस

- पिकातील २० ते ३० टक्के बोंडे फुटल्यानंतर पहिली वेचणी करून घ्यावी. त्यानंतर १५ ते २० दिवसांच्या अंतराने अनुक्रमे दुसरी व तिसरी वेचणी करावी.
- कापूस वेचणी आटोपल्यानंतर सर्व पऱ्हाट्या उपटून शेताबाहेर न्याव्यात व त्याचा कंपोस्ट खत तयार करण्यासाठी वापर करावा. जेणेकरून किडींच्या अवस्था नष्ट होतील.

### ऊस

- आडसाली उसाला साडे चार महिने झाले असल्यास मोठी बांधणीची कामे करावीत. बांधणीचे वेळी प्रति हेक्टरी १६० किलो नत्र (३४७ किलो युरिया), ८५ किलो स्फुरद (५३१ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) व ८५ किलो पालाश (१४२ किलो म्युरेट ऑफ पोटॅश) ही रासायनिक खतांची मात्रा द्यावी तर को ८६०३२ जातीसाठी प्रति हेक्टरी २०० किलो नत्र (४३४ किलो युरिया), १०० किलो स्फुरद (६२५ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) व १०० किलो पालाश (१६६ किलो म्युरेट ऑफ पोटॅश) अशी रासायनिक खतांची मात्रा द्यावी.
- लोकरी मावाग्रस्त उसावर मित्रकीटक असल्यास रासायनिक कीटकनाशकांचा वापर करू नये. लोकरी माव्यासाठी डिफा ॲफिडीव्हरा, मायक्रोमस यासारख्या मित्र किटकांचे संवर्धन करावे. तसेच उसासाठी शिफारशीत रासायनिक खतांचा संतुलीत वापर करावा व ऊस पिकास जास्त पाणी देवू नये.
- ठिबक सिंचनाची सोय असल्यास पाण्याबरोबर प्रती एकरी १२.५ किलो युरीया, ४.५ किलो युरीया फॉस्फेट व १३ किलो म्युरेट ऑफ पोटॅश या विद्राव्य खतांची मात्रा दर आठवडयातून एकदा द्यावी.
- पूर्वहंगामी उसाची लागवडीची कामे नोव्हेंबर अखेरपर्यंत पूर्ण करावीत., कोएम ०२६५, को ८६०३२, कोसी ६७१, फुले १०००१, व्ही.एस.आय.४३४ व को. व्ही.एस.आय.९८०५ या जातींची लागवडीसाठी निवड करावी.
- पाणी बचत होण्याच्या दृष्टीने मध्यम जमिनीसाठी ७५–१५० सी व भारी जमिनीसाठी ९०–१८० सेंमी. पट्टा पध्दतीचा वापर करावा. सलग पद्धतीने लागवडीसाठी मध्यम जमिनीत १०० सें.मी. ते १२० सें.मी. तर भारी जमिनीमध्ये १२० ते १५० सें.मी. दोन सऱ्यातील अंतर ठेवावे. पाण्याच्या बचतीसाठी ठिबक सिंचनाचा वापर करावा.
- लागणीपूर्वी बेण्यास ३०० मिली. मॅलॅथिऑन अथवा २६५ मिली डाय मेथोएट व १०० ग्रॅ बावीस्टीन १०० लिटर पाण्यात मिसळून तयार केलेल्या द्रावणात बेणे १० मिनीटे बुड्वुन बेणे प्रक्रिया करावी. या बिजप्रक्रियेनंतर प्रति हेक्टरी १० किलो

ॲसेटोबॅक्टर अथवा १ लिटर द्रवरूप ॲसेटोबॅक्टर व स्फुरद विरघळविणारे जीवाणू १.२५ किलो १०० लिटर पाण्यात मिसळून तयार केलेल्या द्रावणात कांडया ३० मिनीटे बुडवाव्यात.

- लागणीच्या वेळी प्रति हेक्टरी ४० किलो नत्र (८७ किलो युरिया) को.८६०३२ जातीसाठी व इतर सर्व जातींसाठी ३४ किलो नत्र (७४ किलो युरिया) तसेच ८५ किलो स्फुरद (५३१ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) आणि ८५ किलो पालाश (१४२ किलो म्युरेट ऑफ पोटॅश) ही रासायनिक खते सरीमध्ये द्यावीत.
- पूर्वहंगामी उसात आंतरपिक म्हणून बटाटा, पानकोबी, फुलकोबी, वाटाणा व कांदा, यासारख्या भाजीपाला पिकांचा समावेश करावा.

### हरभरा व्यवस्थापन

- पेरणीनंतर २० दिवसांनी पहिली व ३० दिवसांनी दुसरी कोळपणी करावी.
- कोळपणीनंतर दोन रोपातील तण काढण्यासाठी खुरपणी करावी.
- घाटेआळीच्या नियंत्रणासाठी ५ टक्के निंबोळी अर्काची पहिली फवारणी करावी.

### तूर

- कमी कालावधीच्या पीक वाणांची पक्वतेनुसार काढणी व मळणी करावी.

### नाचणी

- काढणीचा हंगाम : नोव्हेंबर – डिसेंबर
- पक्वतेची लक्षणे – पाने वाळतात, दाण्याचा रंग पिवळसर तपकिरी होवून कणसे तांबूस होतात.
- काढणीची पद्धत : कणसे खुडणे किंवा जमिनीबरोबर कापणी करणे.
- मळणी : कणसे बडवणे/बैलाने मळणी करणे/मळणी मशीन
- मळणीची वेळ : डिसेंबर– जानेवारी

### रब्बी ज्वारी

- गरजेप्रमाणे दुसरी खुरपणी करावी व पेरणीनंतर ८ आठवड्यांनी दातेरे कोळप्याने तिसरी कोळपणी करून गरज असल्यास दुसरे संरक्षित पाणी द्यावे.

### गहू

- कमी पाण्यावर येणाऱ्या गव्हाची पेरणी नोव्हेंबरच्या १० तारखेपर्यंत करावी.
- कमी पाण्यावर येणाऱ्या गव्हाच्या पेरणीसाठी नेत्रावती व डि.बी.डब्लु.९३ या सुधारीत वाणांचा वापर करावा.
- कमी पाण्यावर येणाऱ्या गव्हाच्या पेरणीसाठी प्रती हेक्टर ७५ ते १०० किलो बियाणांचा वापर करावा.
- बागायती गव्हासाठी पाण्याचा चांगला निचरा होणारी, भारी व खोल जमिनीची निवड करावी. तथापि, मध्यम जमिनीत भरखते व रासायनिक खतांचा योग्य वापर केल्यास उत्पादन चांगले घेता येईल.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
वर्ष :१, अंक क्रं. : १०, ऑक्टोबर, २०२१

- गव्हाच्या लागवडीपुर्वी खरीपाचे पीक निघाल्यानंतर १५ ते २० से.मी. खोलीवर नांगरट करावी.
- कुळवाच्या तीन ते चार पाळ्या द्याव्यात. खरीपामध्ये शेणखत दिले नसल्यास हेक्टरी १० टन चांगले कुजलेले शेणखत जमिनीमध्ये मिसळावे.
- गव्हाची बागायती वेळेवर पेरणी नोव्हेंबरच्या पहिल्या पंधरवाडयात करावी.
- वेळेवर पेरणीसाठी फुले समाधान, त्र्यंबक, तपोवन, एमएसीएस ६२२२, एमएसीएस ६४७८, डि.बी. डब्ल्यू. १६८ या सुधारीत वाणांचा वापर करावा.
- पेरणीपुर्वी प्रती किलो गहू बियाण्यास ३ ग्रॅम कॅप्टन किंवा थायरमची बीजप्रक्रिया करावी. त्यानंतर प्रत्येकी २५० ग्रॅम अझोटोबॅक्टर आणि पीएसबी प्रति १० किलो बियाण्यास गुळाच्या थंड पाण्यात मिसळून चोळावे. असे बीजप्रक्रिया केलेले बियाणे तासभर सावलीत सुकवावे आणि मग पेरणी करावी.
- बागायती वेळेवर पेरणी करतांना दोन ओळीत २० से.मी. अंतर ठेवून करावी. पेरणीसाठी दर हेक्टरी १०० किलो बियाणे वापरावे.

### गव्हाकरिता पाणी देण्याच्या संवेदनशील अवस्था

- मुकुटमुळे फुटण्याची अवस्था: पेरणीनंतर १८ ते २१ दिवस
- कांडी धरण्याची अवस्था: पेरणीनंतर ४० ते ४५ दिवस
- फुलोरा आणि चीक भरण्याची अवस्था: पेरणीनंतर ६० ते ६४ दिवस
- दाणे भरण्याची अवस्था : पेरणीनंतर ८० ते ८५ दिवस
- पाणीपुरवठा अपुरा असल्यास काही ठराविक वेळेलाच पाणी देणे शक्य असेल तर पाण्याच्या पाळ्या पुढीलप्रमाणे द्याव्यात.
- एकच पाणी देणे शक्य असल्यास ते ४० ते ४२ दिवसांनी द्यावे.
- दोन पाणी देणे शक्य असल्यास, पहिले पाणी २० ते २२, दुसरे पाणी ६० ते ६५ दिवसांनी द्यावे.
- तीन पाणी देणे शक्य असल्यास, पहिले पाणी २० ते २२, दुसरे पाणी ४० ते ४२ व तिसरे पाणी ६० ते ६५ दिवसांनी द्यावे.

### आले

- हिवाळयात १२ ते १५ दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. पानावरील ठिपके रोगापासून आले पिकाचा बचाव करावा या रोगाची सुरुवात कोवळया पानावर होऊन नंतर तो सर्व पानावर पसरतो या रासेगामध्ये असंख्य लहान गोलाकार ठिपके तयार होतात. रागाची तीव्रता वाढत गेल्यास हे ठिपके एकत्र येवून संपूर्ण पान करपते. नियंत्रणासाठी डायथेन एम ४५, १० लिटर पाण्यात २५ ते ३० ग्रॅम किंवा बाविस्टीन १० लिटर पाण्यात १० ते १५ ग्रॅम किंवा १ टक्के बोर्डोमिश्रण तयार करून फवारणी करावी. हवामानाच्या परिस्थितीनुसार सप्टेंबर ते नोव्हेंबर या कालावधीत १५ ते २० दिवसाच्या अंतराने फवारण्या कराव्यात. वरील औषधांचे आलटून-पालटून फवारण्या कराव्यात. एकच औषध सतत फवारणीसाठी वापरू नये.

## पशुसंवर्धन

- दुध उत्पादनानुसार पशुखाद्य व आहारात योग्य तो बदल करावा.
- नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या आठवडयात लाळखुरकत, फऱ्या व घटसर्प या रोगांची एकत्रित रोगप्रतिबंध लस टोचून घ्यावी.
- जनावरांचे थंडीपासून संरक्षण करावे.

## अवजारे

फुले कडबा कुट्टी यंत्र

- लहान व मध्यम शेतकऱ्यांसाठी विद्दुतचलीत कडबा कुट्टी यंत्र उपयुक्त
- सिंगल फेज अश्वशक्ती विद्युत मोटरचलीत यंत्र
- ओला चारा तसेच कोरडा चारा कुट्टी करण्याची क्षमता

प्रकाशक : **डॉ. शरद गडाख**
संचालक, विस्तार शिक्षण
प्रमुख संपादक : **डॉ. पंडित खर्डे**
प्रभारी अधिकारी, प्रसारण केंद्र
सहसंपादक : **डॉ. सचिन सदाफळ**
सहाय्यक प्राध्यापक, प्रसारण केंद्र
**श्री. सुनिल राजमाने**
कृषि सहाय्यक, प्रसारण केंद्र
डिझाईनर : **श्री. सिध्दार्थ साळवे**
प्रसारण केंद्र
मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र. २४०७/२०२१